दिनांक - ०९/०४/२०२४

# प्रेस नोट

## खुनाच्या प्रयत्नातील व इतर दोन इसमांच्या खुनाचा कट रचणाऱ्या व मुंबईमध्ये दहशत माजविणाऱ्या कुविख्यात गुंडास अग्निशस्त्रासह गुन्हे शाखेने पकडलेबाबत.

| | |
|---|---|
| कक्ष | गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष-०४, गुअवि; ॲन्टॉपहिल, मुंबई |
| पोलीस ठाणे, गुरक्र. व कलम | ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र. १८६/२०२४ कलम ३०७, १२०(ब) भा.द.वि. सह ३,२५,२७ हत्यार कायदा सह १३५ म.पो.का. |
| गुन्हा घडला दि., वेळ व ठिकाण | दिनांक ०६/०४/२०२४ रोजीचे ०५ ते ०५:४५ वाजताच्या दरम्यान नवतरुन नाईक नगर , कृष्णा हॉटेलच्या पाठीमागे, ॲन्टॉपहिल चर्च जवळ, ॲन्टॉपहिल, मुंबई |
| दाखल दिनांक | दिनांक ०६/०४/२०२४ रोजीचे १३:२० वाजता |
| अटक आरोपींची संख्या | विवेक देवराज चेट्टीयार, वय - २६ वर्षे, रा.ठि.वडाळा, मुंबई |

**थोडक्यात हकिकत**

दिनांक ०६/०४/२०२४ रोजी कोकरी आगार, ॲन्टॉपहिल परिसरात पहाटे ०५:४० वाजताच्या सुमारास मो/सायकल वरुन आलेल्या अज्ञात इसमाने एका इसमावर गोळीबार करुन पसार झाल्याची घटना घडली होती. सदर झाल्या प्रकाराबाबत ॲन्टॉपहिल पोलीस ठाणे या ठिकाणी अज्ञात इससाच्या विरोधात वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखे मार्फत, करण्यात येत होता. त्या करीता गुन्हे शाखेची वेग-वेगळी पथके स्थापन करुन अज्ञात इसमाचा शोध घेण्यात येत होता.

दिनांक ०९/०४/२०२४ रोजी गुन्हे शाखेकडून स्थापन करण्यात आलेल्या पथकांमार्फत तांत्रीक बाबींचा आभ्यास करुन तसेच पारंपारीक मानवी कौशल्याच्या आधारे सदर गुन्हयातील पाहीजे आरोपीताचा शोध घेत असताना नमुद आरोपी स्वत:चे अस्तित्व लपवून डोंबीवली परिसरात लपून बसला असल्याची गोपनिय माहिती गुन्हे शाखा, कक्ष-४ ला प्राप्त झाली होती. त्यावरुन गुन्हे शाखेच्या पथकाने डोंबवली परिसरातील कोळेगांव, कटई नाका या ठिकाणी गुप्तपणे सापळा रचून थांबले असता नमुद गुन्हयातील पाहीजे आरोपी हा सदर ठिकाणी पहाटेच्या सुमारास आला असता त्यास नमुद पथकाने पळून जाण्याची संधी न देता घेरावा घालून व झडप टाकून ताब्यात घेतले. व त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे असलेल्या काळया रंगाच्या सॅक बॅगमध्ये एक देशी बनावटीचे पिस्टल व सहा जिवंत काडतूसे व एक रिकामी पुंगळी तसेच त्याने गुन्हयाच्या समयी वापरलेले कपडे मिळून आले ते पंचनाम्या अंतर्गत ताब्यात घेण्यात आले आहेत.

नमुद आरोपीताकडे चौकशी केली असता नमुद आरोपीतास मा. न्यायालयाने कोव्हीड कालावधित अभिवचन रजेवर सोडले होते. त्यानंतर तो पुन्हा कारागृहामध्ये हजर झालेला नाही. त्याच्या विरोधात खुन, खुनाचा प्रयत्न व अग्निशस्त्र जवळ बाळगणे अशा प्रकारचे एकूण १२ गंभीर गुन्हे दाखल असल्याची व त्याच्या विरोधात वेग-वेगळया न्यायालयाने अजामीनपात्र वॉरन्ट देखील जारी केली आहेत.

**आरोपीताकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता तो नजीकच्या काळामध्ये आणखी दोन इसमांवर जिवघेणा हल्ला करणार असल्याची माहिती समजून आली. अशा प्रकारे नमुद आरोपीताच्या अटके मुळे दोन इसमांचा प्राण वाचविण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.**

Scanned with CamScanner

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त(गुन्हे) श्री लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री शशी मिना , मा.पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. दत्ता नलावडे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त (डी-मध्य), श्री.चेतन काकडे यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी पोलीस निरीक्षक इंद्रजित मोरे, पो.नि. अजित गोंधळी, स.पो.नि. समीर मुजावर, स.पो.नि. अजय बिराजदार, पो.उप.नि. शामसुदर भिसे, पो.उ.नि. भावे, स.फौ. वशिष्ठ कोकणे, स.फौ. शेडगे, पो.ह. शरद शिंदे, पो.ह. निर्भवणे, पो.ह.संजय तुपे, पो.ह. देवार्डे, पो.शि. संजय गायकवाड, पो.शि. प्रमोद पाटील, पो.शि.शुभम सावंत, पो.शि. सय्यद, पो.शि.चा. प्रसाद गरवड व चव्हाण यांनी पार पाडलेली आहे.

Scanned with CamScanner